सार्वजनिक आरोग्य विभाग,
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
१० वा मजला,नवीन मंत्रालय, मुंबई ४००००१.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२१

## अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक-सेप्रनि-२०१९/शुश्रृषा/प्र.क्र.१४०/सेवा-५.- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन आणि याबाबतीत केलेले सर्व विद्यमान नियम, आदेश, शासन निर्णय किंवा अनुदेश अधिक्रमित करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र परिचर्या सेवेतील "सहायक अधिसेविका, पाठयनिर्देशिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, मनोरुग्ण तज्ञ परिचारिका, बालरुग्ण तज्ञ परिचारिका, परिसेविका, अधिपरिचारिका" (गट-क) या पदांच्या सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत. जसे :-

१. या नियमांस, शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिपत्याखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील व राज्य कामगार विमा योजनेतील महाराष्ट्र परिचर्या सेवेतील सहायक अधिसेविका, पाठयनिर्देशिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका निर्देशिका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, मनोरुग्ण तज्ञ परिचारिका, बालरुग्ण तज्ञ परिचारिका, परिसेविका, अधिपरिचारिका" (गट-क) महाराष्ट्र परिचर्या सेवा (सेवाप्रवेश) नियम, २०२१" असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, -

क) "बेसीक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग" याचा अर्थ, भारतीय परिचर्या परिषदने व इतर कोणत्याही संविधिक विद्यापीठाने दिलेली बेसीक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग पदवी, असा आहे;

ख) "परिचर्या महाविद्यालय" याचा अर्थ, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील परिचर्यामधील पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी प्रमाणपत्र देणारे महाविद्यालय, असा आहे;

ग) "आयुक्त" या अर्थ, आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, महाराष्ट्र राज्य असा आहे;

घ) "आयुक्तालय" याचा अर्थ, आरोग्य सेवा आयुक्तालय व राज्य कामगार विमा योजना आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

ङ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक आरोग्य विभाग, असा आहे;

च) “भारतीय परिचर्या परिषद” याचा अर्थ, भारतीय परिचर्या परिषद अधिनियम, १९४७ (१९४७ चा ४८) याच्या कलम ३ च्या पोटकलम (१) अन्वये गठित केलेली परिषद असा आहे;

छ) "जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी पदविका" याचा अर्थ भारतीय परिचर्या परिषदेच्या व महाराष्ट्र परिचर्या परिषदेच्या मान्यतेनुसार परिचर्या क्षेत्रातील शासकीय संस्थेतून मिळवलेले जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी पदविका प्रमाणपत्र, असा आहे;

ज) “शासन” याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

झ) "भारतीय परिचर्या परिषद" याचा अर्थ, भारतीय परिचर्या परिषद अधिनियम, १९४७ (१९४७ चा ४८) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) अन्वये गठित केलेली भारतीय परिचर्या परिषद, असा आहे;

ट) "मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग" याचा अर्थ, भारतीय परिचर्या परिषदने किंवा इतर कोणत्याही संविधिक विद्यापिठाने दिलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग पदवी, असा आहे;

ठ) “महाराष्ट्र परिचर्या परिषद” याचा अर्थ, महाराष्ट्र परिचारिका अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा.४०) याच्या कलम ३ च्या पोट-कलम (१) गठित केलेली परिषद, असा आहे;

ड) “मान्यता प्राप्त संस्था” याचा अर्थ, भारतीय परिचर्या परिषदेने, महाराष्ट्र परिचर्या परिषदेने, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाने, आरोग्य विज्ञान विद्यापीठाने व शासकीय व शासनमान्यताप्राप्त विद्यापीठाने मान्यता दिलेली संस्था, असा आहे.

३. (१) सहाय्यक अधिसेविका /सहाय्यक अधिसेवक या पदावरील नियुक्ती, परिसेविका किंवा सार्वजनिक आरोग्य परिचारिका किंवा मनोरुग्णतज्ञ परिचारिका किंवा बालरुग्णतज्ञ परिचारिका हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण केलेल्या व्यक्तींमधून, योग्यतेस अधीन राहून, सेवाज्येष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, परिसेविका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, मनोरुग्णतज्ञ परिचारिका व बालरुग्णतज्ञ परिचारिका यांच्यामधून अनुक्रमे ६०:१०:१५:१५ या प्रमाणात पदोन्नतीने करण्यात येईल.

४. (१) पाठयनिर्देशिका/पाठयनिर्देशक या पदावरील नियुक्ती, एकतर, -

**(क)** आयुक्तालयातील अखत्यारीतील परिसेविका, सार्वजनिक आरोग्य परिचारिका, मनोरुग्णतज्ञ परिचारिका व बालरुग्णतज्ञ परिचारिका हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग धारण करणाऱ्या व्यक्तींमधून, योग्यतेस अधीन राहून, सेवाजेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने नियुक्ती करण्यात येईल, किंवा

**(ख)** अधिपरिचारिका/अधिपरिचारक या पदावर किमान ३ वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण असणाऱ्या व मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग धारण करणाऱ्या आणि पाठयनिर्देशिका/पाठयनिदेशक या पदाच्या विभागीय परीक्षेद्वारे (विभागीय परिक्षेमध्ये रुग्णसेवा व अध्यापन कौशल्ये यांचा अंतर्भाव असेल) गुणवत्तेच्या आधारे नियुक्ती करण्यात येईल, **किंवा**

**(ग)** जे उमेदवार,-

(एक) अठरा वर्षांपेक्षा कमी आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत**;** परंतु राखीव प्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल;

परंतु असे की, अगोदरच शासनाच्या नियमित सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल;

(दोन) मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग धारण करतात; आणि

(तीन) शासकीय किंवा खाजगी रुग्णालयातील रुग्णांची सेवा किंवा शुश्रुषा करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव धारण करतात अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने, विभागीय परीक्षेद्वारे व नामनिर्देशनाद्वारे ५०:२५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

५. सार्वजनिक आरोग्य परिचारीका निर्देशिका/सार्वजनिक आरोग्य परिचारक निर्देशक या पदावरील नियुक्ती, आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील सार्वजनिक आरोग्य परिचारिका/परिचारक या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा पूर्ण असणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल.

६. **(१) सार्वजनिक आरोग्य परिचारिका/परिचारक** या पदावरील नियुक्ती, एकतर,-

**(क)** अधिपरिचारीका/अधिपरिचारक हे पद धारण करणाऱ्या व या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि

(एक) मान्यताप्राप्त संस्थेमधून कम्युनिटी हेल्थ नर्सिंग यामधील विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग; किंवा

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ नर्सिंग (११ महिने) यासह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेस अधीन राहून सेवाजेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

**(ख)** जे उमेदवार,-

(एक) अठरा वर्षांपेक्षा कमी आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत**;** परंतु, राखीव वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल;

परंतु असे की, अगोदरच शासनाच्या नियमित सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षांपर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून कम्युनिटी हेल्थ नर्सिंग यामध्ये विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग धारण करतात; किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसिक डिप्लोमा इन पब्लिक हेल्थ नर्सिंग (११ महिने) यासह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी धारण करतात; आणि

(तीन) शासकीय/खाजगी रुग्णालयातील रुग्णांची सेवा किंवा शुश्रुषा करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव असेल, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

(२) पोट - नियम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने, अनुक्रमे ७५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

७. **(१) मनोरुग्णतज्ञ परिचारिका / परिचारक या पदावरील नियुक्ती एकतर, -**

**(क)** आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील अधिपरिचारीका/ अधिपरिचारक या पदावर किमान तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि

(एक) मान्यताप्राप्त संस्थेमधून सायकॅट्रीक नर्सिंग मधील विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग**;** किंवा

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रीक नर्सिंग (११ महिने) यांसह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल

नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेस अधीन राहून जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल**;** किंवा

**(ख)** जे उमेदवार, -

(एक) अठरा वर्षांपेक्षा कमी आणि अडतीस वर्षापेक्षा अधिक वयाचे नाहीत**;**
परंतु, राखीव वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल;

परंतु असे की, अगोदरच शासनाच्या नियमित सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून सायकॅट्रीक नर्सिंग यामधील विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग**;** किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसिक डिप्लोमा इन सायकॅट्रीक नर्सिंग (११ महिने) यांसह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी धारण करतात **;** आणि

(तीन) शासकीय/खाजगी रुग्णालयातील रुग्णांची परिचर्या किंवा शुश्रुषा करण्याचा किमान तीन वर्षाचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

(२) पोट - कलम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ७५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

८. (१) बालरोग तज्ञ परिचारिका/परिचारक या पदाची नियुक्ती एकतर, -

**(क)** आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील अधिपरिचारीका/अधिपरिचारक या पदावर किमान किमान तीन वर्षापेक्षा कमी नाही इतकी नियमित सेवा असणाऱ्या आणि, -

(एक) मान्यताप्राप्त संस्थेमधून पेडिॲट्रीक्स नर्सिंग यामधील विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग**;** किंवा

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसीक डिप्लोमा इन पेडिॲट्रीक्स नर्सिंग (११ महिने) यांसह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग ॲण्ड मिडवायफरी धारण करणाऱ्या व्यक्तींमधून योग्यतेस अधीन राहून जेष्ठतेच्या आधारे योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल**;** किंवा

**(ख)** जे उमेदवार,**-**

(एक) अठरा वर्षांपेक्षा कमी आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत;

परंतु राखीव वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल;

परंतु असे की, अगोदरच शासनाच्या नियमित सेवेत असलेल्या उमेदवारांच्या बाबतीत उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल; आणि,

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेमधून पेडिअ‍ॅट्रिक्स नर्सिंग यामधील विशेषता असलेली मास्टर ऑफ सायन्स-नर्सिंग; किंवा मान्यताप्राप्त संस्थेमधून पोस्ट बेसीक डिप्लोमा इन पेडिअ‍ॅट्रिक्स नर्सिंग (११ महिने) यांसह मान्यताप्राप्त संस्थेमधून बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग अ‍ॅण्ड मिडवायफरी धारण करतात ; आणि

(तीन) शासकीय/खाजगी रुग्णालयातील रुग्णांची परिचर्या किंवा शुश्रुषा करण्याचा किमान तीन वर्षांचा अनुभव आहे, अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाने करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, पदोन्नतीने व नामनिर्देशनाने अनुक्रमे ७५:२५ या प्रमाणात करण्यात येईल.

९. परिसेविका/परिसेवक या पदावरील नियुक्ती, आयुक्तालयातील अधिपरिचारीका/ अधिपरिचारक हे पद धारण करणाऱ्या व त्या पदावर किमान तीन वर्षांची नियमित सेवा असणाऱ्या व्यक्तीमधून संबंधित परिमंडळाच्या उपसंचालकाद्वारे योग्यतेच्या अधीन राहून सेवाजेष्ठतेच्या आधारे पदोन्नतीने करण्यात येईल.

१०. (१) अधिपरिचारिका/अधिपरिचारक पदावरील नियुक्ती, जे उमेदवार,-

**(एक)** अठरा वर्षांपेक्षा कमी आणि अडतीस वर्षांपेक्षा अधिक वयाचे नाहीत;
**परंतु राखीव वर्गातील उमेदवारांच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल करण्यात येईल;**

(दोन) मान्यताप्राप्त संस्थेतील बेसिक बॅचलर ऑफ सायन्स-नर्सिंग किंवा जनरल नर्सिंग अ‍ॅण्ड मिडवायफरी धारण करतात, अशा उमेदवारांमधून, नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

(२) पोट-नियम (१) मध्ये नमूद केलेल्या पदावरील नियुक्ती, शासकीय परिचर्या

महाविद्यालयामधून व खाजगी परिचर्या महाविद्यालयामधून, अनुक्रमे ५०:५० या प्रमाणात करण्यात येईल.

११. नियम ४, ६, ७, ८ व १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर सरळसेवेने नियुक्तीसाठी स्त्री व पुरुष यांचे प्रमाण अनुक्रमे ९०:१० इतके असेल.

१२. नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्त केलेल्या व्यक्तीने महाराष्ट्र परिचारीका अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ४०) अन्वये त्याची स्वत:ची किंवा तिची स्वत:ची नियुक्तीपूर्वी नोंदणी केली नसेल तर, पदासाठी अर्ज करण्यापूर्वी नोंदणी करणे आवश्यक असेल. उक्त अधिनियमात विनिर्दिष्ट केलेला कालावधी पूर्ण होण्यापूर्वी त्याने/तिने वेळोवेळी अशा नोंदणीचे नूतनीकरण करणे आवश्यक असेल.

१३. भारतीय परिचर्या परिषदेच्या निकषानुसार, दुरस्थ शिक्षणाद्वारे कोणत्याही मुक्त विद्यापीठातून यात विनिर्दिष्ट केलेली परिचर्येमधील अर्हता धारण करणारा तसेच दूरस्थ शिक्षणाद्वारे कोणत्याही मुक्त विद्यापिठातून परिचर्येमधील अशी अर्हता प्राप्त केल्यानंतर ज्याने मान्यता प्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी धारण केली आहे असा उमेदवार, नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या अशा पदांकरिता नियुक्तीसाठी पात्र असणार नाही.

१४. (१) नियम ४, ६, ७, ८ व १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर सरळसेवेने नियुक्त केलेली व्यक्ती, एक वर्षाच्या कालावधीसाठी परिवीक्षेवर असेल. परिवीक्षा कालावधी, जास्तीत जास्त एक वर्षापर्यंत वाढविता येईल. सदर पदावर नियुक्ती केलेल्या व्यक्तीने, परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल. परिवीक्षा कालावधी पूर्ण होण्यासाठी रुग्णसेवेसाठी ६० गुण व ४० गुण लेखी परीक्षेसाठी यांचा समावेश असणारी जिल्हा रुग्णालयाने घेतलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य असेल. जर त्याने/तिने परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण न केल्यास अथवा विहित परिवीक्षा कालावधीत तो/ती, त्या पदासाठी योग्य असल्याचे आढळून न आलयास, तो/ती सेवा समाप्त करण्यास पात्र असेल.

(२) नियम ४, ६, ७, ८ व १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर सरळसेवेने नियुक्त केलेली व्यक्ती परिवीक्षाधीन कालावधी जिल्हा रुग्णालयात सहा महिने रुग्णसेवा करुन पूर्ण करील.

१५. नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्त झालेल्या व्यक्तीने विभागीय परीक्षा (विहीत केलेली असल्यास कोणतीही) आणि याबाबतीत केलेल्या नियमांनुसार तो किंवा ती, हिंदी व मराठी भाषा परीक्षा अगोदरच उत्तीर्ण झालेला नसेल अथवा या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून त्याला किंवा तिला सूट मिळालेली नसेल तर, या दोन्ही उत्तीर्ण होणे आवश्यक असेल.

१६. नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, शासनाच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहीत केलेले संगणक चालवण्याचे प्रमाणपत्र धारण करील.

१७. नियम ३ ते ८ मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्त झालेली व्यक्ती महाराष्ट्रात कोठेही बदलीस पात्र असेल, तसेच नियम ९ व १० मध्ये नमूद केलेली पदे परिमंडळात बदलीस पात्र असतील.

१८. नियम ४, ६, ७, ८ व १० मध्ये नमूद पदावर सरळसेवेने नियुक्त झालेल्या व्यक्तीने, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५ यानुसार शासनाने वेळोवेळी विहित केलेले लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र नियुक्तीच्या वेळी सादर करावयाचे आहे, अन्यथा ती व्यक्ती शासकीय सेवेसाठी अपात्र ठरेल.

१९. नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्ती करण्यासाठी विहित केलेल्या शैक्षणिक अर्हता, अनुभव व अन्य शर्ती, भारतीय परिचर्या परिषदेकडून वेळोवेळी सुधारणा केल्याप्रमाणे व मान्यता दिल्याप्रमाणे लागू होतील.

२०. नियम ३ ते १० मध्ये नमूद केलेल्या पदांपैकी कोणत्याही पदावर नियुक्त झालेली व्यक्ती, आवश्यकतेनुसार भारतीय संरक्षण सेवेअंतर्गत सेवा करण्यास पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pradeep Vyas

(डॉ. प्रदीप व्यास)

प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) **मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.**
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त (आरोग्य सेवा) व अभियान संचालक, एनएचएम, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य विमा संस्था, वरळी, मुंबई.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
९) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई / पुणे.
१०) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
११) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).

१२) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
१३) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
१४) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
१५) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
१६) निवड नस्ती (सेवा-५).